वर्ष-०६ | अंक-५० | मुंबई, मंगळवार ०३ ते ०९ नोव्हेंबर-२०२० | पृष्ठ-४ | मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक • कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक • सह संपादक : सौ. डॉ. अश्विनी नाईक

PG 2 कोपरखैरणे पोलीस ठाण्याने लहान मुलीचे अपहरण करणाऱ्या आरोपीला १२ तासात केले गजाआड

3 → सेनेचं 'स्वबळ', भाजपच्या पोटात अजून कळ!

प्रतिबंधक व शरीरास प्राणघातक अशा मादक पदार्थाचा साठा करुन...... ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## BMC च्या वतीने 244 ठिकाणी 'कोविड'ची मोफत वैद्यकीय चाचणी



कोविड-१९ विषयक वैद्यकीय चाचण्या करण्यावर देखील बृहन्मुंबई महानगरपालिका सातत्याने ...पान २ वर...

## क्यारच्या तडाख्यातील विद्यार्थी शुल्कमाफीच्या प्रतीक्षेत



राज्यात आलेल्या क्यार वादळ आणि अवेळी झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. त्यामुळे क्यारचा फटका बसलेल्या २४ तालुक्यांतील ...पान २ वर...

## सूर्य-चंद्र तुमच्या बापाचे नोकर नाहीत

## कर्नाटकच्या उपमुख्यमंत्र्यांना

# शिवसेनेचा कडक इशारा




मुंबई: 'सूर्य-चंद्र असेपर्यंत बेळगाव कर्नाटकातच राहील' अशी दर्पोक्ती करणारे कर्नाटकचे उपमुख्यमंत्री लक्ष्मण सवदी यांच्यावर शिवसेनेनं घणाघाती टीका केली आहे. 'सूर्य-चंद्र तुमच्या बापाचे नोकर नाहीत. हे याद राखा! सूर्य-चंद्राच्याच साक्षीने कर्नाटकातून तुमची अरेरावी नष्ट होईल व मराठी बांधवांचा लढा यशस्वी होईल,' असा इशाराही शिवसेनेनं दिला आहे. १ नोव्हेंबर हा कर्नाटकचा स्थापना दिन आहे. बेळगावसह सीमाभागातील मराठी भाषिक हा दिवस काळा दिवस म्हणून पाळतात. त्या पार्श्वभूमीवर सवदी यांनी महाराष्ट्राला डिवचणारे वक्तव्य केले होते. महाराष्ट्रातील नेते कितीही ओरडत असले तरी जोपर्यंत सूर्य-चंद्र आहेत तोपर्यंत बेळगाव कर्नाटकातच राहील असं ते म्हणाले होते. त्यांच्या या वक्तव्याचा 'सामना'च्या अग्रलेखातून जोरदार समाचार घेण्यात आला आहे. 'लक्ष्मण सवदी गोधडीत रांगत होते, त्याआधीपासून २० लाख मराठी बांधव महाराष्ट्रात येण्यासाठी संघर्ष करीत आहेत. सध्या बेळगावचा तिढा सर्वोच्च न्यायालयात लटकला आहे. सूर्य-चंद्र आकाशात आहेत की नाहीत हे पाहून सर्वोच्च न्यायालय बेळगावप्रश्नी निकाल देणार नाही आणि सूर्य-चंद्र हे काही कुणाच्या बापाचे नोकर नाहीत. सूर्याच्या ढळढळीत प्रकाशझोतात बेळगावचा लढा सुरू आहे. त्याच सूर्यप्रकाशात कानडी पोलीस 'जय महाराष्ट्र' म्हणणाऱ्या मराठी बांधवांवर अत्याचार करीत आहेत व रात्रीच्या अंधारात छत्रपती शिवरायांचा पुतळा हटवीत असतात. पण तेथील मराठी बांधवांचे मनोधैर्य खचले नाही हाच शिवरायांचा आशीर्वाद आहे,' असं शिवसेनेनं म्हटलं आहे.सीमा भागातील २० लाख मराठी बांधवांवर काळा दिवस पाळण्याची वेळ कोणी आणली? ...पान २ वर...

## करोना संकटात पब, बार खचाखच



मुंबई, करोनाचा संसर्ग वाढू नये यासाठी सरकारने हॉटेल्स, बार आणि पब सुरू करताना काही नियम आणि अटी घातल्या आहे. मात्र, मालकांकडून या नियमांचे उल्लंघन केले जात असून, बार आणि पब ग्राहकांनी खचाखच भरत आहेत. मुंबई पोलिसांच्या समाजसेवा शाखेने शनिवारी अंधेरी येथील दोन बार आणि पबवर छापा टाकून तब्बल १९६ जणांवर कारवाई केली.अंधेरीच्या पेनिन्सुला हॉटेलमधील 'ओपा बार अँड कॅफे' आणि 'मित्रो' या पबमध्ये ग्राहकांची प्रचंड गर्दी होती असल्याची माहिती मुंबई पोलिसांच्या समाजसेवा शाखेला मिळाली. करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सामाजिक वावर, तसेच इतर कोणतेच नियम पाळले जात असल्याचे समजले. समाजसेवा शाखेच्या पथकाने एकाच वेळी बार आणि पब मध्ये छापा टाकला. दोन्ही ठिकाणी ग्राहकांची प्रचंड गर्दी आढळली. कोणताही सामाजिक वावर न ठेवता पबमध्ये लोक नाचताना दिसत होते. ५० टक्के ग्राहकसंख्या असणे नियमात असतानाही दोन्ही ठिकाणी १०० टक्के हाऊसफुल्ल होते.

समाजसेवा शाखेच्या पथकाने दोन्ही ठिकाणाहून १९६ जणांना ताब्यात घेतले. यामध्ये दोन मालक, तीन व्यवस्थापक, १९ कर्मचारी आणि १७१ ग्राहकांचा समावेश असून, यात महिलाही असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## पालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस जाहीर



मुंबई : मुंबई महानगरपालिकेवर प्रचंड प्रमाणात ताण येणार असला तरीही कर्मचाऱ्यांची दिवाळी चांगल्या पद्धतीनं साजरा व्हावी यासाठी आयुक्त इक्बाल चहल आणि खुद्द मुख्यमंत्री उद्धव ठाकरे प्रयत्नशील असल्याचं म्हणत मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर यांनी एक चांगली बातमी दिली. सर्व कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान जाहीर केलं. महानगरपालिकेच्या सर्व कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस म्हणून १५५०० रुपयांचं सानुग्रह अनुदान जाहीर केलं. ...पान २ वर...

## गुन्हे शाखा युनिट 4 पिंपरी चिंचवड ची धडाकेबाज कामगिरी..



वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक देशमुख आणि गुन्हे शाखा युनिट 4च्या पथक कडुन कारच्या काचा फोडून लॅपटॉप चोरणारी टोळया अटक एकूण 13 गुन्हे उघड करून 13 लाखाचे 18 लॅपटॉप व इतर मुद्देमाल केला जप्त

## सर्वसामान्य नागरिकांच्या जिवाशी खेळून व त्यांची फसवणूक करुन नामांकित कंपनीच्या दुधात भेसळ करणारी टोळी जेरबंद



दिंडोशी येथील शिवाजीनगर ओंकार चाळ गोरेगाव परिसरात नामांकित कंपनीच्या दूधात भेसळ करून नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या तिघांचा गोखरधंदा दहिसर पूर्व मुंबई गुन्हे शाखेच्या युनिट-१२च्या पथकाने उध्दवस्त केला. त्या ...पान २ वर...

# यूपीत तयार होणाऱ्या बनावट मास्कची मुंबईत विक्री





## मुंबई पोलिसांनी केला कारखाना उध्वस्त

कोरोनाला दूर ठेवण्यासाठी मास्क लावणे गरजेचे झाले आहे. मास्क हा सध्या नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील घटक झाला आहे. विविध प्रकारचे रंगीबेरंगी मास्क बाजारात उपलब्ध आहेत. अनेक बड्या कंपन्या मास्कच्या व्यवसायात उतरल्या असून या कंपन्यांच्या नावाचा वापर करून बनावट मास्क तयार करणाऱ्या टोळ्या मोठ्या प्रमाणात कार्यरत आहे. मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने अशाच एका टोळीचा छडा लावून बनावट मास्क तयार होत असलेला कारखानाच उध्वस्त केला आहे.उत्तर प्रदेशातील गाजियाबाद शहरात एका नामांकित कंपनीचे नाव लावून हुबेहूब बनावट मास्कची निर्मिती करणारा कारखाना उध्वस्त करण्यात आला असून या कारखान्याच्या मालकाला अटक करण्यात आली आहे.

काही महिन्यांपूर्वी मुंबईतील लोअर परळ या ठिकाणी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखा कक्ष ३ च्या पथकाने टेम्पो भरून 'विनस' या कंपनीचे एन-९५ बनावट मास्कचा साठा पकडण्यात आला होता.

या प्रकरणी एकाला अटक करण्यात आली होती. या गुन्ह्याचा तपास सुरू असताना विनस कंपनीच्या एन-९५ मास्क हे उत्तर प्रदेशातील गाजियाबाद या ठिकाणी तयार होत असल्याची माहिती गुन्हे शाखा कक्ष ५ चे प्रभारी पोलीस निरीक्षक अशोक खोत यांना मिळाली. या माहितीच्या आधारे प्रभारी पोलीस निरीक्षक खोत, पोलीस निरीक्षक नितीन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गजानन भारती, पो. अंमलदार शिवाजी जाधव, भास्कर गायकवाड आणि पथक यांनी गाजियाबाद येथे जाऊन बनावट मास्क तयार करण्याचा कारखान्याचा शोध घेऊन त्या ठिकाणी छापा टाकला. या छाप्यात पोलिसांनी मोठ्या प्रमाणात विनस कंपनीचे एन-९५, व्ही-४१० मॉडेल चे तयार केलेले मास्क, मास्क तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल, मास्क तयार करण्यात येणारी डेल्टा कंपनीची मशीन, प्रिंटिंग मशीन जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणी कारखाना मालक मोहम्मद सोहेल मोहम्मद इद्रिस अन्सारी (३१) याला अटक करण्यात आलेली आहे. गाजियाबाद येथे तयार होणारे बनावट मास्क हे भारतात मोठ्या प्रमाणात मागणीनुसार पुरवठा करण्यात येत होता.

तसेच राज्यातील ठाणे, नवीमुंबई, मुंबई आणि पालघर इत्यादी ठिकाणी या बनावट मास्कची मोठी मागणी होती अशी माहिती कक्ष ३ चे प्रभारी पोलीस निरीक्षक अशोक खोत यांनी दिली.



# बांग्लादेशींना नागरिकत्व मिळून देण्यासाठी वापरले MIM च्या आमदारांचे लेटर हेड

मुंबई, भारताचा बांग्लादेश बनवण्याचा जणू काही लोकांनी चंगच बांधलाय की काय? असा प्रश्न आता निर्माण झाला आहे. कारण, मुंबई पोलिसांनी अटक केलेल्या 2 एजंटच्या तपासातून धक्कादायक माहिती समोर आली आहे. मुंबईपासून ते नाशिक पुणे, नागपूर आणि भारतातील सर्व महत्त्वाच्या शहरांमध्ये बांग्लादेशींना भारतीय नागरिकत्व मिळवून देण्याकरता बनावट सरकारी दस्तावेजांचा वापर केला जात होता आणि हे बनावट सरकारी दस्तावेज बनवण्याकरता आमदारांच्या लेटर हेडचा वापर केला जात होता.कुणीही या भारताचे नागरिकत्व घ्या, कोणतीही अट नाही. प्रतिबंधित देशांच्या नागरिकांनाही भारतात सहज नागरिकत्व दिलं जाणार, दिलं जाणार नाही तर दिलं जातंय आणि ते ही सर्व कायदे पायदळी तुडवून. मुंबई पोलिसांनी 155



आधार कार्ड, 34 पासपोर्ट, 28 पेन कार्ड, 8 रेशन कार्ड, मतदान ओळखपत्र, 187 बँक आणि पोस्टाचे पास बुक, 19 रबर स्टॅम्प आणि २९ शाळा सोडल्याचे दाखले जप्त केले आहेत ही सर्व कागदपत्रे बनावट आहेत आणि धक्कादायक म्हणजे, या सरकारी दस्ताऐवज ज्यांचे आहेत ते भारतीय नागरिक नसून बांग्लादेशी नागरिक आहेत. मुंबई पोलिसांच्या साकीनाका पोलिसांनी अटक केलेल्या २ एजंटकडून हा धक्कादायक खुलासा झाला. या 2 एजंटकडून साकीनाका पोलिसांनी 7 लेटर हेड जप्त केलेत जे MIM चे आमदार मुफ्ती मुहम्मद इस्माईल अब्दुल खालीख आणि आमदार शेख असिफ शेख रशीद यांचे आहेत. ज्यांच्या साह्यायाने बांग्लादेशी नागरिकांना रेशनकार्ड, बँक खाते आणि पोस्टातील खाती उघडून त्यांचे प्राथमिक सरकारी दस्तावेज बनवले जात होते.

## ८८ टक्के लोकल रुळांवर



मुंबई, मुंबई लोकलवरील दोन हजार ७७३ लोकल अर्थात ८८ टक्के फेऱ्या आज, सोमवारपासून पुन्हा रुळांवर येणार आहेत. १५ डब्यांच्या लोकलसह महिला विशेष आणि वातानुकूलित लोकलही सुरू झाल्या आहेत. यामुळे आता गर्दी नियंत्रणाचा उपाय करून सर्व सामान्यांसाठी प्रवासमुभा देण्याची घोषणा नेमकी कधी होणार याकडे प्रवाशांचे लक्ष लागले आहे. मुंबईची लाइफलाइन सर्वांसाठी खुली करण्याबाबत राज्य आणि रेल्वे यांच्यात अनेकदा चर्चा झाली. विविध प्रस्ताव ठेवण्यात आले. मात्र गर्दी नियंत्रणाचे उपायावर एकमत झाले नाही. यामुळे सर्वांसाठी लोकलप्रवासावर तूर्त बंदी कायम आहे. मध्य आणि पश्चिम रेल्वेवर अनुक्रमे ५५२ आणि २०१ लोकल फेऱ्या वाढवण्यात आल्या आहेत. यामुळे मध्य आणि हार्बरवरील एकूण लोकल फेऱ्यांची संख्या एक हजार ५७२ झाली आहे, तर पश्चिम रेल्वेवरील एकूण फेऱ्यांचा आकडा एक हजार २०१पर्यंत पोहचला आहे, असे रेल्वे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## मुंबई महापालिकेकडून एसटीला ३० कोटी



मुंबई, मुंबईकरांच्या सेवेत बेस्ट उपक्रमाच्या सहाय्यासाठी पाठविलेल्या एसटी महामंडळाच्या ताफ्यासाठी पालिकेने आतापर्यंत ३० कोटी ७४ लाखांहून अधिक मोबदला मोजला आहे. लॉकडाउनपासून बेस्ट उपक्रम मुंबईकरांना सेवा देत आहेत. लॉकडाउन शिथील झाल्यानंतर बेस्टप्रवास खुला झाल्यानंतर आपसूकच सेवेवरील ताण वाढला. तेव्हा बेस्टमधील गर्दी पाहून एसटी महामंडळाच्या ताफ्यातील बससेवाही उपलब्ध करण्यात आल्या. मात्र, या सेवांसाठी येणाऱ्या खर्चाचा भार मुंबई पालिकेवर टाकण्यात आला होता. त्यानुसार पालिकेने एसटी महामंडळास ही रक्कम दिली. बेस्ट बसेसमध्ये होणारी गर्दी लक्षात घेऊन एसटीकडून हजार बसचा ताफा पाठविण्याची घोषणा करण्यात आली. बेस्ट उपक्रमाची आर्थिक क्षमता रोडावल्याने या खर्चाचा भार पालिकेवर आला आहे.

# कोपरखैरणे पोलीस ठाण्याने लहान मुलीचे अपहरण करणाऱ्या आरोपीला 12 तासात केले गजाआड




सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार दिनांक.२३/१०/२०२० रोजी फिर्यादी नामक व्यक्ती यांची मुलगी वय १६ वर्षे ही खैरणे तलाव येथे जाऊन येते, असे बोलून घराबाहेर निघाली. खूप वेळा नंतर ती घरी परत न आल्यामुळे फिर्यादी यांनी तिचा सर्वत्र शोध घेतला. परंतु, मुलगी कुठेही मिळत नसल्याकारणाने फिर्यादी यांना शंका आली की एका कुठल्यातरी अज्ञात व्यक्तीने फिर्यादीच्या रखवालीतून त्याच्या संमतीशिवाय मुलीचे अपहर केले असावे. म्हणून फिर्याद यांनी पोलीस ठाण्यात जाऊन तत्काळ गुन्हा नोंद क्र. २४६/२०२० कलम ३६३ भादवि अन्वये गुन्हा नोंद केली.सदर प्रकरण गंभीर स्वरूपाचे असल्याकारणामुळे या प्रकरणात मा.सह.पोलीस आयुक्त, पोलीस उप.आयुक्त परी १ सहाय्यक पोलीस आयुक्त वाशी विभाग यांनी आरोपीचा शोध घेण्यासाठी मार्गदर्शन केले. सदर गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून कोपरखैरणे पोलीस ठाण्याचे पोलीस निरक्षक विश्वकार व स.पो.नि प्रवीण पांडे, स.पो.नि. वसीम शेख, स.पो.नि. कविता सुतार, पो.उ.प.नि. मनोज महाडिक, पो.उ.प.नि. सागर धुमाळ , व पोलीस पथक असे तपास पथक तयार केले.घटनास्थळी आजुबाजूच्या लोकांकडे चौकशी केली. त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे तांत्रिक तपास गोपनिय सूत्रांकडून माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला. पोलीस पथकाने मानखुर्द, मुंबई येथे परिश्रमपूर्वक शोध घेतला.शोध घेत असताना पोलिस पथकाला आरोपी हा मोटरसायकलने अपहरण केलेल्या फिर्यादीच्या मुलीला वेगाने घेऊन जाताना दिसून आला. तत्काळ पोलीसांनी आरोपींचा पाठलाग करून त्याला इंदिरानगर मानखुर्द, मुंबई या ठिकाणी मोटरसायकल आणि फिर्यादीच्या मुलीसह ताब्यात घेतले.सदर गुन्ह्याचा कुशलतेने तपास करून तब्बल १२ तासात पोलीस पथकाने आरोपीला अटक केली. आरोपीची चौकशी करत असताना त्यांनी त्याचे नाव. सुनिल अंगद राजभर ,वय २१ वर्ष रा.कोपरखैरणे गाव ,नवी मुंबई असे सांगितले. सदर गुन्हा अत्यंत संवेदनशील असल्यामुळे कोपर खैरणे पोलीस ठाण्याने १२ तासाच्या आत आरोपीला अटक करून अल्पवयीन मुलीची सुटका करून दिली.

# बाईकचोर टोळक्याच्या मुसक्या आवळल्या, दोघे अल्पवयीन!

उल्हासनगर मधील एका २४ वर्षीय तरुणावर चाकूने वार करून त्याची मोटारसायकल जबरदस्तीने चोरुन नेणाऱ्या ३ जणांच्या टोळक्याला उल्हासनगर गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. आरोपींना ताब्यात घेतले असता त्यांनी तब्बल १० मोटारसायकल चोरी केल्याचे निष्पन्न झाले आहे, या टोळीचा मुख्य सूत्रधार लाला उर्फ रियाज मोहम्मद मणियार हा अवघ्या १८ वर्षांचा असून त्याचे दोन साथीदार हे अल्पवयीन आहेत.

३० ऑक्टोबर रोजी रात्री ८ वाजताच्या सुमारास उल्हासनगर – २ येथील खेमानी परिसरात राहणारा विनयकुमार बाकेलाल यादव ( २४ ) हा त्याची चुलत बहीण कविता हिला औषधोपचारासाठी जवळच्या खाजगी दवाखान्यात घेऊन आला होता. त्याने मोनिका कॉम्प्लेक्स या इमारतीजवळ मोटारसायकल पार्क केली होती. काही वेळाने दवाखान्यातून विनयकुमार आणि त्याची बहीण बाहेर आले व मोटारसायकलकडे जाऊ लागले. तेव्हा विनयकुमारची मोटारसायकल तीन अज्ञात इसम डुप्लिकेट चावीने उघडत असल्याचे त्याने पाहिले. त्याने आरोपींना थांबविण्याचा प्रयत्न केला असता आरोपींनी त्याला शिवीगाळ करून मारहाण केली. नंतर चाकूने वार करून आरोपी फरार झाले. अत्यंत वर्दळीच्या ठिकाणी हा गुन्हा घडल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली होती.

या प्रकरणी फिर्यादी विनयकुमार याने उल्हासनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली असता पोलिसांनी ३ अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू केला असता कामगार हॉस्पिटलजवळ एक जण संशयास्पद स्थितीत वावरताना आढळला. पोलिसांनी त्याला शिताफीने ताब्यात घेतले आणि चौकशी सुरू केली असता त्याने आपले नाव लाला उर्फ रियाज मोहम्मद मणियार असल्याचे सांगून तो उल्हासनगर – येथील बाल्कजी बारी येथे राहत असल्याचे सांगितले. पुढील तपासात त्याने त्याच्या २ अल्पवयीन



साथीदारांसह ३ लाख ५० हजार रुपये किंमतीच्या ७ एक्टिव्हा स्कूटर, ३ मोटारसायकल वेळवेगळ्या ठिकाणाहून चोरी केल्याची कबुली दिली आहे.

यावेळी आरोपींनी विनायकुमारची चोरी केलेली मोटारसायकल उल्हासनगर – २ मधील आझादनगर परिसरात रामभाऊ म्हाळगी चौक जवळ पार्क केल्याचे आढळून आले. पोलिसांनी ही मोटारसायकल ताब्यात घेतली आहे. याशिवाय इतर चोरीच्या एक्टिव्हा स्कूटर आणि मोटारसायकल देखील हस्तगत केल्या आहेत.

# 5 गर्लफ्रेंड्स असलेल्या निखिल ठाकरेचा प्रताप पाहून पोलीसही झाले अवाक्



कल्याण,: कल्याणमध्ये पोलिसांनी एका मोबाइल चोराला अटक केली आहे. या मोबाइल चोरट्याकडून दहा मोबाइल जप्त करण्यात आले आहेत. एका साथीदाराच्या मदतीने हा चोरटा मोबाइल हिसकावून पळ काढायचा. विशेष म्हणजे, निखील ठाकरे नावाच्या या चोरट्याच्या पाच गर्लफ्रेंड असून त्यांची हौस भागविण्यासाठी हा मोबाइल चोरायचा. कल्याण-डोंबिवली परिसरात गेल्या काही दिवसांपासून मोबाइल चोरीच्या घटनेत वाढ झाली होती.

ॲक्टिव्हा स्कुटरवर स्वार दोन चोरटे लोकांच्या हातातील मोबाइल हिसकावून पसार व्हायचे. कल्याण पश्चिमेतील वालधूनी परिसरात एका तरुणाचा मोबाइल हिसकावून चोरट्यांनी पळ काढल्याची घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली होती. या सीसीटीव्हीच्या सहाय्याने कल्याणच्या महात्मा फुले पोलिसांनी तपास सुरू केला. या घटनेचा तपास पोलीस अधिकारी प्रकाश पाटील यांच्याकडे दिला गेला. अखेर पोलिसांना तपासात यश आले. भिवंडी येथील नांदेडकरमध्ये राहणारा मोबाइल चोरटा निखील ठाकरे याला अटक करण्यात आली. त्याच्याकडून पोलिसांनी दहा मोबाइल हस्तगत केले. कल्याणमधील तीन घटना उघडकीस आल्या आहेत. अन्य मोबाइल याने कुठून चोरले आहे. याचा तपास सुरू आहे. तसंच, त्याच्या एका साथीदाराचा शोध सुरू आहे. निखील याला पाच गर्लफ्रेंड आहेत. तो प्रत्येक गर्लफ्रेंडची हौस भागवतो. त्याच्याकडे खूप पैसा आहे. हे दाखविण्यासाठी निखिलने मोबाईल चोरीचा धंदा सुरू केला होता. अखेर आता पोलिसांनी त्याचा मुसक्या आवळल्या आहेत. या सोबतच महात्मा फुले पोलिसांनी दुसऱ्या प्रकरणातील दोन मोबाइल चोरटे अविनाश विठ्ठल आणि एका अल्पवयीन मुलाला अटक करुन त्याच्यांकडूनही मोबाईल हस्तगत केले आहेत.

# महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ५ पदवीधर, शिक्षक मतदारसंघांची निवडणूक जाहीर!



राज्यात एकीकडे महाराष्ट्र विधान परिषदेवर राज्यपाल नियुक्त सदस्य पाठवण्यावरून राजकारण सुरू झालेलं असताना आता परिषदेवरच्या पदवीधर आणि शिक्षक अशा एकूण ५ मतदारसंघांची निवडणूक जाहीर झाली आहे. येत्या १ डिसेंबर रोजी यासाठी मतदान होणार आहे. विधान परिषदेवरील शिक्षक आणि पदवीधर अशा एकूण ५ आमदारांचा कालावधी १९ जुलै २०२० रोजी संपला होता. मात्र, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर या निवडणुकीला मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर आता अनलॉक झाल्यानंतर या निवडणुकांची घोषणा करण्यात आली आहे. यानुसार १ डिसेंबररोजी या ५ जागांसाठी मतदान होणार आहे. तर ३ डिसेंबर रोजी मतमोजणी केली जाणार आहे. ७ डिसेंबरपूर्वी पूर्ण मतदान प्रक्रिया पूर्ण करणं अनिवार्य असणार आहे. विधानपरिषदेतील सतीष चव्हाण, चंद्रकांत पाटील आणि अनिल सोले हे पदवीधर आमदार तर श्रीकांत देशपांडे आणि दत्तात्रय सावंत या शिक्षक आमदारांचा कालावधी १९ जुलै रोजी संपला. यापैकी चंद्रकांत पाटील यांची २०१९मध्ये झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत निवड झाल्यामुळे ती जागा आधीच रिक्त झाली होती. नव्या निवडणूक कार्यक्रमानुसार, ५ नोव्हेंबरला या निवडणुकीसंदर्भात नोटिफिकेशन काढण्यात येणार असून १२ नोव्हेंबरपर्यंत अर्ज भरण्याची शेवटची मुदत असेल. १३ नोव्हेंबरला अर्जांची छाननी करण्यात येईल. त्यानंतर १७ नोव्हेंबर रोजी अर्ज मागे घेण्याची शेवटची मुदत असेल. १ डिसेंबरला सकाळी ८ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत मतदानासाठीची वेळ ठेवण्यात आली आहे. परिपत्रक निघाल्यानंतर ताबडतोब या मतदारसंघांमध्ये निवडणूक आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. त्यासोबतच कोरोनासंदर्भातल्या नियमांचं देखील पालन करण्याचं बंधन या निवडणुकांमध्ये असणार आहे. त्यामध्ये मास्क घालणे, थर्मल स्कॅनिंग, सॅनिटायझर, सोशल डिस्टन्सिंगचं पालन अशा महत्त्वाच्या नियमांचा समावेश आहे.

# राज्यात करोनाची दुसरी लाट येण्याची शक्यता?; आरोग्यमंत्री राजेश टोपे म्हणतात...

ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात राज्यातील करोना रुग्णसंख्येत पुन्हा एकदा किंचित वाढ दिसून येत आहे. त्यामुळे ही दुसऱ्या लाटेची सुरुवात आहे का याकडे तज्ज्ञ डॉक्टरांचे लक्ष आहे. मात्र राज्यामध्ये करोनाची दुसरी लाट येण्याची शक्यता कमी असल्याचे मत राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी व्यक्त केलं आहे. तसेच दुसऱ्या लाटेची शक्यता वर्तवण्यात येत असली तरी त्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी राज्य सरकारची पूर्ण तयारी झालेली आहे असंही टोपे यांनी म्हटलं आहे.



“मंत्रिमंळासमोर जे प्रेझेन्टेशन झालं त्यामध्ये आरोग्य विभागाच्या सचिवांनी प्राकर्षाने सांगितलं की महाराष्ट्र आणि आपल्या देशात दुसरी लाट येण्याची शक्यता फार कमी आहे. मात्र ही शक्यता आहे. आपण ज्या अटी-शर्थी घातल्या आहेत, त्यामध्ये सोशल डिस्टन्सिंग ठेवणं, मास्क घालणं, हात सॅनिटाइज करणं या गोष्टी पाळाव्याच लागणार आहेत,” असं टोपे म्हणाले. “फ्रान्स, स्पेन सध्या युरोपमधील अनेक देशात कोरोनाची दुसरी लाट आली आहे. त्यामुळे तिकडच्या अनेक देशांमध्ये पुन्हा लॉकडाऊन करण्यात आलंय. या संदर्भातल्या बातम्या आपण ऐकत आहोत, पाहत आहोत. साहजिकच आपल्याकडे देखील कोरोनाची दुसरी लाट येईल का अशी चर्चा सुरु आहे. मात्र आपल्याकडे कोरोनाची दुसरी लाट येण्याची शक्यता कमी आहे,” असं मत आरोग्यमंत्र्यांनी व्यक्त केलं आहे. “दिवाळीच्या तोंडावर अनेकजण घराबाहेर पडताना, शॉपिंग करताना दिसत आहेत. मात्र हे करतानाही काळजी घेण्याची सूचना मी जनतेला करेन,”, असं टोपे यांनी टीव्ही ९ या वृत्तावाहिनीशी बोलताना म्हटलं आहे.

राज्यामधील मंदिरे उघडण्यासंदर्भातील प्रश्नावर उत्तर देताना टोपे यांनी, “मंदिरं बंद रहावी असं आम्हालाही वाटत नाही. मात्र सध्याच्या परिस्थितीचा विचार करता मंदिरं उघडण्यासंदर्भात दिवाळीनंतरच मुख्यमंत्री चर्चा करुन निर्णय घेतील,” अशी माहिती दिली. मागील काही आठवड्यांपासून विरोधी पक्षाने मंदिरं उघडण्यावरुन अनेकदा सरकारवर टीका केल्याचे पहायला मिळालं आहे.

## पृष्ठ १ वरुन

### शिवसेनेचा कडक इशारा

भाषावार प्रांतरचना केल्यावर मराठी भाषिकांना त्यांच्या हक्काच्या राज्यात जाण्याचा अधिकार का नाकारला गेला? २० लाख मराठी भाषिकांचा आक्रोश, किंकाळ्या, सांडलेले रक्त आणि बलिदानाची पर्वा न करता निव्वळ दडपशाही मार्गाने मराठी भावना चिरडून त्यांना कानडी मुलखात कोंबले हा अन्याय नाही का? हा अन्याय सूर्य-चंद्राच्या साक्षीनेच झाला. लोकशाहीत २० लाख लोकांच्या भावनेस किंमत नसेल तर तुमच्या त्या लोकशाहीची गरज ती काय?,' असा संतप्त सवालही शिवसेनेनं केला आहे.एखाद्या राज्याच्या स्थापना दिवसाला गालबोट लागू नये हे आमचेही मत आहेच, पण कर्नाटक त्याच्या हद्दीतील मराठी बांधवांशी ज्या निर्घृणपणे वागत आहे तो प्रकार संतापजनक आहे. तेथील मराठी भाषा, मराठी शाळा, मराठी नाट्यगृहे, मराठी ग्रंथालये याबाबत अत्यंत अमानुष वर्तन स्वतंत्र भारतात केले जात आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल लागेपर्यंत तेथील मराठी बांधवांशी किमान माणुसकीने वागायला काय जाते? महाराष्ट्रातही लाखो कानडी बांधव आपले उद्योग-व्यवसाय करीत सुखाने राहत आहेत हे लक्ष्मण सवदीसारख्या मंत्र्याने विसरू नये. बेळगावात भगवे झेंडे पायदळी तुडवले जातात, छत्रपती शिवरायांचे पुतळे रातोरात उखडले जातात, मराठी भाषेतले फलक तोडले जातात हा मोगलाईचाच प्रकार आहे.

### BMC च्या वतीने 244 ठिकाणी

भर देत आहे. याच अंतर्गत उद्यापासून म्हणजेच २ नोव्हेंबर २०२० पासून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील विविध दवाखाने, रुग्णालये इत्यादी प्रकारच्या एकूण २४४ ठिकाणी मोफत वैद्यकीय चाचण्यांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. या सुविधेमुळे मुंबईत कोविड विषयक वैद्यकीय चाचणी करण्याची सुविधा ३०० पेक्षा अधिक ठिकाणी उपलब्ध होणार आहे. मुंबईत संभाव्य कोविड संसर्गावर अधिकाधिक प्रभावी नियंत्रण मिळविणे शक्य व्हावे, यासाठी महापालिका आयुक्त इकबाल सिंह चहल यांच्या मार्गदर्शनात मुंबई महानगरपालिका सातत्याने सर्वस्तरीय उपाययोजना करीत आहे. याच उपाययोजनांचा भाग म्हणूनसर्व २४ विभागांमध्ये २४४ ठिकाणी कोविड विषयक वैद्यकीय चाचणी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. विशेष म्हणजे या २४४ ठिकाणांच्या पत्त्यांची यादी विभागनिहाय नियंत्रण कक्षांद्वारे आणि महापालिकेच्या मुख्य नियंत्रण कक्षाच्या ‘१९१६’ या क्रमांकाद्वारेही उपलब्ध करून देण्यात येत आहे. याचबरोबर बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे http:// stopcoronavirus. mcgm.gov.in या स्वतंत्रपणे सुरू करण्यात आलेल्या समर्पित संकेतस्थळावर देखील ही माहिती उपलब्ध करून देण्यात येत आहे. यामुळे संभाव्य रुग्ण महापालिकेच्या ज्या विभागात रहात असेल, त्याच्या घराजवळ असणाऱ्या ठिकाणांची माहिती, ही विभागीय नियंत्रण कक्षांच्या दूरध्वनी क्रमांकांवर किंवा ‘१९१६’ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधल्यानंतर उपलब्ध होणार आहे. तसेच यासाठी संकेतस्थळाचा पर्याय देखील उपलब्ध आहे.यामुळे मुंबईकरांना आपल्या घरालगतच्या परिसरात कोविड विषयक वैद्यकीय चाचणी आता अधिक सुलभतेने व मोफत करवून घेता येणे शक्य होणार आहे. कोविड विषयक वैद्यकीय चाचणी सुविधा उपलब्ध असणाऱ्या ठिकाणांची एकूण संख्या ही ३०० पेक्षा अधिक झाली असून मुंबईकरांना कोविड विषयक वैद्यकीय चाचण्या करण्याचे अधिक पर्याय उपलब्ध झाले आहेत. ज्यामुळे चाचण्यांची संख्या वाढण्यास मदत होण्यासोबतच वेळेत निदान होण्यासही मदत होणार आहे. परिणामी अधिक प्रभावीपणे कोविड संसर्गाला प्रतिबंध करणेही शक्य होणार आहे, अशी माहिती या निमित्ताने अतिरिक्त महापालिका आयुक्त सुरेश काकाणी यांनी दिली आहे. सध्या चाचणीसाठी हे आकारले जातात दर २४४ ठिकाणांव्यतिरिक्त व्यतिरिक्त, महापालिका क्षेत्रातील ५४ खासगी वैद्यकीय प्रयोगशाळांमध्येही या आधीपासूनच कोविड विषयक वैद्यकीय चाचणी सुविधा सशुल्क स्वरूपात उपलब्ध आहे. यासाठी सुधारित शासकीय दरांनुसार घरी येऊन वैद्यकीय चाचणी करण्यासाठी रुपये १,८००; तर वैद्यकीय प्रयोगशाळेत जाऊन चाचणी करवून घेण्यासाठी रुपये १,४०० एवढे शुल्क आहे. या वेळात होणार चाचणी सध्या सुरुवातीला दररोज सकाळी १० ते १२ या कालावधीदरम्यान सदर २४४ ठिकाणी मोफत वैद्यकीय चाचणी सुविधा ‘वॉक इन’ पद्धतीने उपलब्ध असणार आहे.

### क्याारच्या तडाख्यातील विद्यार्थी

विद्यार्थ्यांना शुल्क माफी देण्याचा निर्णय सरकारने जाहीर केला होता. परंतु १० महिने उलटले तरीही विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफी मिळालेली नाही. राज्यात २०१९ मध्ये आलेले वादळ आणि अवेळी पडलेल्या पावसामुळे राज्यातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफी घोषित करण्यात आली होती. यानुसार महसूल व वन विभागाच्या १८ नोव्हेंबरच्या शासन निर्णयानुसार राज्यातील ३४ जिल्ह्यातील ३४९ तालुक्यामधील शेतीपिकांचे व बहुवार्षिक पिकांचे नुकसान झाल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने परीक्षा शुल्क माफी देण्याबाबत जाहीर केलेल्या शासन निर्णयात ३४ जिल्ह्यांतील ३२५ तालुक्यांतील विद्यार्थ्यांना शुल्क माफी जाहीर केली. यामुळे अनेक पात्र विद्यार्थी परीक्षा शुल्क माफीच्या सवलतीपासून वंचित राहीले आहेत. महाराष्ट्रातील २४ तालुक्यातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याची मागणी सुराज्य विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष अमर एकाड यांनी अपर मुख्य सचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग व संचालक उच्च व तंत्रशिक्षण विभाग याच्याकडे केली आहे. या प्रकरणी ३४ जिल्यातील ३२५ तालुक्यांऐवजी ३४९ आपदग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफीसंबंधी योग्य तो आदेश जाहीर करण्याची विनंती तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. अभय वाघ यांनी विभागाच्या अपर मुख्य सचिवांकडे केली आहे. याबाबत लवकरच योग्य तो निर्णय घेतला जाईल अशी आशा विद्यार्थी व्यक्त करत आहेत.

### पालिका कर्मचाऱ्यांना

पालिका आयुक्त चहल यांच्यासोबतच्या बैठकीनंतर महापौर किशोरी पेडणेकर यांनी हा बोनस जाहीर केला. अनुदानप्राप्त खाजगी प्राथमिक शाळेतील शिक्षक, कर्मचाऱ्यांना ७७५० रुपये, मनपा प्राथमिक शाळेतील शिक्षण सेवक ४७०० रुपये, अनुदान प्राप्त खाजगी प्राथमिक शाळेतील शिक्षण सेवक यांना २३५० रुपये बोनस देण्यात येणार आहे. महापौरांनी जाहीर केलेल्या घोषणेप्रमाणं पालिका कामगारांच्या बोनसमध्ये यंदाच्या वर्षी ५०० रुपयांची वाढ झाली आहे. मुख्य म्हणजे या बोनसमुळं पालिकेच्या तिजोरीवर जवळपास १५५ कोटींचा आर्थिक भारही येणार आहे. असं असतानाही कोरोना काळात आपल्या जीवाला धोका पत्करुन काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड व्हावी यासाठीच आपण प्रशासनाकडे आग्रही असल्याचं पेडणेकर यांनी सांगितलं.

### सर्वसामान्य नागरिकांच्या जिवाशी

भेसळखोरांकडून अंदाजे ३१,३२८/-रुपये किंमतीचा तब्बल ६०३ लीटर भेसळयुक्त दूध जप्त करून त्याची त्याच जागी विल्हेवाट लावण्यात आली.दिनांक. २८/१०/२०२० रोजी दिंडोशी येथील शिवाजीनगर परिसरात काही व्यक्ती नामांकित दुधात अस्वच्छ पाणी मिसळून भेसळयुक्त दूध नागरिकांना वितरीत करीत असल्याची खबर युनिट-१२ पोलीस निरीक्षक सचिन गवस यांना मिळाली. त्यानुसार सुमारे ४ वाजताच्या दरम्यान पोलीस पथकाने सदर ठिकाणी छापा टाकला. त्यावेळी हे तीन आरोपी ताजा कंपनीच्या मूळ पिशव्या कात्रीने कापून त्या पिशव्या मधील दुध काही प्रमाणात बाहेर काढून त्यामध्ये मानवी सेवनास हानिकारक असे अस्वच्छ पाणी मिसळून त्या दुधाच्या पिशव्या स्टोव्ह पीन व मेणबत्तीच्या साहाय्याने पुन्हा सिल करत असताना रंगेहात सापडले. तात्काळ त्याठिकाणी या आरोपींना ताब्यात घेऊन त्यांना अटक करण्यात आली.तसेच हे आरोपी नामांकित कंपनीचे प्रमाणित दूध आहे असे भासवून सामान्य नागरिकांची फसवणूक करीत असल्याचे निदर्शनास आले.ताब्यात घेतलेल्या आरोपींवर गुन्हा रोजी क्र ८०५/२०२० कलम २७२,४८२,४८६,४२०,४६८,३४ भादवि सह कलम २६,२७,३(१)(झेड.एक्स) अन्नसुरक्षा व मानदे कायदा २००६ नियम व नियमन २०११ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे व पुढील तपास दिंडोशी पोलीस ठाणे करीत आहेत.सदरची गुन्ह्याची यशस्वी कामगिरी मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री.मिलिंद भारंबे, मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.एस. विरेश प्रभु, मा.पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१)श्री. अकबर पठाण, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्र.डी- उत्तर) श्री. संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलीस निरीक्षक महेश तावडे, पोलीस निरीक्षक सचिन गवस, सहाय्यक पोलीस निरीक्षक. प्रकाश सावंत, पोलीस उप.निरीक्षक.श्री.हरीष पोळ, तसेच अन्न सुरक्षा अधिकारी श्री. जी.पी. लिंबुरकर व पथक यांनी पार पाडली आहे.

पोलीस बातमी पत्र

महामुंबई



मुंबई, मंगळवार ०३ ते ०९ नोव्हेंबर-२०२०



## संपादकीय...

### सेनेचं 'स्वबळ', भाजपच्या पोटात अजून कळ!

मुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी चार दिवसांपूर्वी शिवसेनेच्या सर्व जिल्हाप्रमुखांची ऑनलाइन बैठक घेतली. 'विधानसभेवर स्वबळावर भगवा फडकविण्यासाठी सज्ज व्हा' असं आवाहन त्यांनी त्या बैठकीत केल्याच्या बातम्या छापून आल्या. राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी त्यावर खोचक प्रतिक्रिया दिली. 'स्वबळाची ही भाषा मी तीस वर्षांपासून ऐकतोय' असा चिमटा त्यांनी काढला. तीन पक्षांचं सरकार आपण चालवतोय याचं भान उद्धवजींना नक्कीच आहे; पण तरीही पक्षातील नेत्यांचं मनोबल वाढविण्यासाठी तसं बोलावंच लागतं. शरद पवार पंतप्रधान होणार हेही आपण जवळपास तीस वर्षांपासून ऐकतोच आहोत ना! पण स्वत: पवार यांनी 'माझ्या पक्षाचे खासदार किती, पंतप्रधान होण्यासाठी लागणारं संख्याबळ किती, या सगळ्यांचं भान मला आहे', असं वेळोवेळी म्हटलंच आहे. १९९५ पासून आतापर्यंतच्या २५ वर्षांत महाराष्ट्रातील मतदारांनीही युती वा आघाडी धर्मावरच शिक्कामोर्तब केलेलं आहे. गेल्यावेळी ते युतीवर केलं आणि सरकार आघाडीचं आलं हा भाग वेगळा. आघाडीशिवाय पर्याय नसलेली शिवसेना स्वबळाचं स्वप्न पाहत आहे अन् सर्वाधिक आमदार निवडून येऊनही सत्तेसाठी आवश्यक असलेले आणखी २५-३० आमदार मिळविण्याच्या विवंचनेत भाजपचं मनोधैर्य खचत चाललं आहे. भाजपचे केंद्रातील एकेक मित्रपक्ष सोडून जात आहेत आणि महाराष्ट्रात चंगूमंगू पक्षांशिवाय मोठा मित्र मिळत नाही ही अडचण आहे. आपलं सरकार येणार, हे छातीठोकपणे सांगत असलेल्या भाजप नेत्यांना 'आकड्यांचा मेळ कसा साधणार?' असं विचारलं की ते 'तुम्ही फक्त पाहत राहा, डिसेंबरमध्ये चमत्कार होईल!' एवढंच सांगतात. हे केवळ विशफुल थिंकिंग आहे. भाजपपासून शिवसेना खूपच दुरावली अन् दुखावली आहे. दसरा मेळाव्यातील त्यांच्या भाषणात ही कटुता दिसली. भाजपवाल्यांना आवडो न आवडो, पण ठाकरेंच्या भाषणानं शिवसेना चार्ज्ड झाली. शरद पवार कधीही भाजपसोबत जाणार नाहीत. भाजपसोबत जावं असं वाटणाऱ्या त्यांच्या आप्तस्वकीयांचे मनसुबे म्हणूनच प्रत्यक्षात उतरत नाहीत. राज्यातील काँग्रेसच्या नेत्यांना सत्ता सोडण्याची दूरदूर इच्छा नाही. त्यामुळे सरकार 'फेविकॉल का जोड' होत चाललं आहे. तरीही बिहारच्या निकालावर बरंच काही अवलंबून असेल. तिथे नितीशकुमार-भाजप हे कॉम्बिनेशन जिंकलं तर महाराष्ट्रात पहाटेच्या शपथविधीची पुनरावृत्ती होऊ शकेल. पार्टनर कोण असेल ते आताच सांगता येत नाही. भाजप खुर्द अन् भाजप बुद्रुकमधील वाद खेड्यात एकाच गावाचे दोन भाग असतात ते म्हणजे खुर्द अन् बुद्रुक. खुर्द हे लहान तर त्या मानानं बुद्रुक मोठं असतं. गाव एकच; पण एखादी नदी, ओढ्यानं ते विभागलेलं असतं. गावावर संकट आलं की सगळे एक होतात. एरव्ही बरेचदा आपसी वाद उद्भवतात अन् ते सामोपचारानं पंचायतीसमोर मिटतातही. महाराष्ट्र भाजपमध्ये असं खुर्द-बुद्रुकचं वातावरण सध्या दिसतं आहे. तिथेही एका पंचायतीची गरज आहे. काही नेते समृद्ध अडगळ ठरू लागले आहेत. एकनाथ खडसे सोडून गेले हा पक्षासाठी आत्मचिंतनाचा विषय असल्याचं एका नेत्याला वाटतं, तर दुसरा म्हणतो की खडसेंनीच आत्मचिंतन करण्याची गरज आहे. यातून विरोधाभास दिसतो. महाविकास आघाडीच्या सरकारला घेरण्याची मोठी संधी असताना भाजपचे नेते एकमेकांना पाण्यात पाहताना दिसत आहेत. सामाजिक अस्मितांना आणखी टोक मराठा आरक्षण, धनगर आरक्षण, मुस्लीम आरक्षण, ओबीसींवरील अन्याय, पदोन्नतीतील आरक्षण अशा मुद्द्यांवर सामाजिक अस्मिता टोकदार होत असतानाच त्या आपसातील संघर्षाचा विषय ठरू पाहताहेत. अकरावीची प्रवेशप्रक्रिया आरक्षणाच्या मुद्द्यावरून रखडली. एमपीएससीची परीक्षा रद्द झाली. पदोन्नतीतील आरक्षणावरून कर्मचाऱ्यांमध्ये आपसात कटुता आहे. बडे अधिकारी, सामान्य कर्मचाऱ्यांचे जातनिहाय व्हॉट्सअ‍ॅप ग्रुप विद्वेषाचे वाहक बनले आहेत. सवलतींच्या गाडीत बसण्यावरूनचे वाद तीव्र होण्याची भीती आहे. ते टोकाला जाऊ न देण्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे. अधिकार मिळेनात; राज्यमंत्र्यांमध्ये खदखदबरेचसे कॅबिनेट मंत्री अधिकारच देत नसल्याने राज्यमंत्र्यांमध्ये कमालीची अस्वस्थता आहे. सगळ्याच पक्षांचे राज्यमंत्री सध्या एकत्र आले असून, दर आठवड्याला भेटून चर्चा करतात. मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंकडे बहुतेकांनी तक्रारी केल्या. राज्यमंत्री बच्चू कडूंचंच घ्या, जलसंपदा, कामगार, शालेय शिक्षण, महिला व बालविकास आदी महत्त्वाची खाती त्यांच्याकडे आहेत; पण जलसंपदाचे कॅबिनेट मंत्री जयंत पाटील सोडले तर त्यांना कोणी अधिकारच देत नाही. पूर्वी एक राज्यमंत्री गजानन महाराजांची मूर्ती, फोटोंना नमस्कार करत दिवसभर रिकामे बसलेले असत. बिनपगारी फुल अधिकारी अशी राज्यमंत्र्यांची अवस्था अजूनही कायम आहे.

# नुकसान कोणाचे?

## धर्मवेडय़ांकडे एखादेच वा मोजकीच श्रद्धास्थाने असतील, पण फ्रेंचांकडे उदंड प्रतीके आहेत.. अगदी 'ईश्वरनिंदेचा अधिकार' हेसुद्धा फ्रेंच प्रतीकच ठरते!



प्रतीकांची ही समृद्धी फ्रेंचांनी वैचारिक संघर्षांतून, उद्यमशीलतेतून आणि मुख्य म्हणजे मोकळेपणामधून मिळवलेली आहे; तीही 'भावना दुखावल्या' वगैरे फंदात न पडता..ईश्वरनिंदा हा मुद्दा फ्रान्समध्ये अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या कक्षेत येतो. ईश्वरनिंदेला त्या देशात कायदेशीर अधिष्ठान आहे. पण म्हणून साम्यवादी देशांप्रमाणे येथे ईश्वरभक्तांची सरसकट गळचेपी केली जात नाही. ईश्वरी आराधना करण्याचा हक्क जितका पवित्र, तितकाच ईश्वर ही संकल्पनाच झुगारून देऊन तिची टिंगल करण्याचा हक्कही त्या देशात पवित्र मानला जातो. व्यक्तीइतकेच महत्त्व तिच्या अभिव्यक्तीला. अभिव्यक्त होण्याने कोणाच्या भावना वगैरे दुखावल्या जातात हा मुद्दाच तेथे गृहीत धरला जात नाही. धर्माच्या नावाखाली एखाद्या व्यक्तीची टिंगलटवाळी करणे किंवा तिला हिंसाचारास उद्युक्त करणे हे निषिद्ध आहे. परंतु प्रत्यक्ष एखाद्या धर्माची आणि त्या धर्माच्या केंद्रस्थानी असलेल्या ईश्वराची टिंगल निषिद्ध नाही! धर्मनिरपेक्षता ही तेथे विधिसंमत आहे आणि त्याची कठोर अंमलबजावणी करण्याची तेथे परंपराही आहे. आपल्याकडेही 'धर्मनिरपेक्ष' हा शब्द संविधानाच्या सरनाम्यात असला, तरी धार्मिक प्रतीकांविषयी अभिव्यक्त होण्याबाबत काही अलिखित नियम-मर्यादा आहेत. हे स्वातंत्र्य सरसकट आणि अनिर्बंध नाही. फ्रान्समध्ये तसे नाही. किंबहुना, अन्य कित्येक पाश्चिमात्य देशांपेक्षाही अधिक आग्रहाने अभिव्यक्तीची जपणूक फ्रान्समध्ये होते आणि ईश्वरनिंदा करण्याच्या हक्काला मोकळीक दिली जाते. गेल्या काही वर्षांत हा देश इस्लामवादी जिहादींचे लक्ष्य ठरू लागला आहे, याचे प्रमुख कारण हे आहे. १६ ऑक्टोबर रोजी सॅम्युएल पाटी नामे शिक्षकाचा झालेला शिरच्छेद, मग परवा गुरुवारी नाइस शहरातील एका चर्चमध्ये झालेली तिघांची हत्या (त्यातही एकाचा शिरच्छेद) ही कृत्ये इस्लामवादी दहशतवाद्यांनीच केल्याचे सिद्ध झाले आहे. २०१५ मध्ये 'शार्ली एब्दो' या व्यंग्यचित्राधारित मासिकाच्या कार्यालयावर झालेला हल्ला, पॅरिसमध्ये त्याच वर्षी झालेले भयंकर दहशतवादी हल्ले, नाइस शहरातच एका जमावातील ८० जणांना चिरडणारा आणखी एक हल्ला या घटना ताज्या आहेत. अमेरिका आणि भारतानंतर जिहादी दहशतवादाची झळ पोहोचलेला फ्रान्स हा तिसरा मोठा लोकशाहीवादी देश ठरतो. प्रत्येक देशासंदर्भात कारणे वेगवेगळी असली, तरी फ्रान्सच्या बाबतीत हे हल्ले अधिक सातत्याने होताना दिसतात. त्यांमागील कारणे शोधणे आपल्या दृष्टीनेही हितावह आहे.धर्म आणि ईश्वरी प्रतीकांच्या बाबतीत समाजजीवनात वेगाने झिरपत चाललेला हळवेपणा आणि कडवेपणा हा काही मूलभूत प्रश्नांना तोंड फोडतो. प्रेषित मोहम्मदाचा अवमान करणाऱ्यास मृत्युदंड द्यावा हा धर्मादेशच असल्याचा सोयीस्कर गैरसमज जिहादी गटांनी करून घेतला किंवा या विनाधार गृहीतकाचा राजकीय फायद्यासाठी गैरवापरही केला. अफगाणिस्तानातील तालिबान किंवा सीरिया-इराकमध्ये आयसिस या संघटनांचा उद्देश धार्मिक नव्हे, तर राजकीय होता. सत्ता हेच साध्य होते आणि तथाकथित धर्मयुद्ध हे साधन. धर्मयुद्धाचा मुलामा चढवून धर्मभोळ्यांची सहानुभूती मिळवायची हा तर कोणत्याही धर्माचा ठरलेला खेळ. धर्मयुद्ध का करायचे, तर (म्हणे) धर्म संकटात आहे म्हणून. खरे तर धर्मप्रसार आणि त्या नावाखाली धर्मसंहार या तद्दन मध्ययुगीन संकल्पना. रोजच्या जगण्यातली आव्हानेच इतकी व्यामिश्र आणि प्रचंड आहेत, की धर्मासाठी कुणाशी लढाया करण्याची फुरसत आणि गरज जवळपास संपुष्टात आलेली आहे. ही गरज कोणाला पुनरुज्जीवित आणि पुनस्थापित करावीशी वाटणार? ज्यांची बुद्धी व्यग्र नाही आणि हाताला काम नाही अशांपैकीच बहुतांना! एरवी धर्म संकटात आहे यावर अन्य कोणा शहाण्याचा कसा काय विश्वास बसेल? सक्तीने धर्मांतर करून किंवा विशिष्ट धर्मीयांचा संहार करून एखादा धर्मच संपुष्टात आणण्याचे दिवस केव्हाच सरले. आज आंतरराष्ट्रीय कायदे आलेत, वैचारिक आदानप्रदान आले, परस्पर सहकार्यातून कामगार, व्यापार आणि सेवांचे आदानप्रदान अपरिहार्य बनले आहे. भूतलावरील कोणताही देश किंवा समूह स्वयंपूर्ण व एकल राहिलेला नाही, राहू शकत नाही. या स्थितीत एखादा धर्म दुसऱ्या धर्माच्या वरचढ ठरेल ही शक्यताच नाही. तरीही तसे भासवले जाते आणि धर्मयुद्धाच्या नावाखाली संहार घडवले जात आहेत. गेल्या दोन दशकांमध्ये याबाबतीत इस्लामवादी जिहादी गट आघाडीवर आहेत हे निर्विवाद वास्तव आहे. ज्या कुराणचा हवाला ही मंडळी सरसकट देतात, त्यांच्यापैकी एकानेही पूर्ण कुराण वाचून काढले असते तर जिहादमागील फोलपणा त्याच्या तत्क्षणी लक्षात आला असता. मुळात जिहाद याच शब्दाचा सर्वाधिक गैरवापर झाला. जिहाद म्हणजे संघर्ष. तो केवळ धार्मिक असण्याची गरजच नाही. विषमता, गरिबी, भ्रष्टाचार अशा अनेक मानवरिपुंविरोधात संघर्ष करता येतो, जिहाद छेडता येतो. पण तसे झालेले नाही. कारण इस्लामवाद्यांना अशा अतिरेकापासून परावृत्त करण्यात इस्लामी राजकीय नेतृत्वाइतकेच वैचारिक नेतृत्वही कमी पडते आहे. किंबहुना, राजकीय नेतृत्वाला 'धार्मिकतेची चटक' लागल्यानंतर विवेक आणि चिकित्सेचे स्मरण करून देत राहण्याची जबाबदारी विचारवंतांवर येते. फ्रान्समधील घटनांविषयी अशी वैचारिक तत्परता आणि भान इस्लामी विचारवंतांनीअधिक व्यापकपणे आणि आग्रहाने दाखवण्याची गरज आहे.फ्रेंच संस्कृती आणि वैचारिक चौकटीमध्ये अभिव्यक्तिस्वातंत्र्याला नेहमीच अनन्यसाधारण महत्त्व राहिलेले आहे. बंधुता, समता, स्वातंत्र्य ही मूल्ये फ्रेंचांनीच जगाला दिली. यातून सर्जनशीलता आणि उद्यमशीलता या दोहोंना धुमारे फुटले. आयफेल टॉवर, लूव्र संग्रहालय आणि सिनेमाथेक फ्रॉन्सेसारखे चित्रपट संग्रहालय इथलेच. आधुनिक ऑलिम्पिक चळवळ आणि विश्वचषक फुटबॉल या संकल्पना याच भूमीत जन्माला आल्या. एअरबसही इथले नि राफेलही इथलेच. ही अस्सल फ्रेंच प्रतीके. पण त्याचबरोबर धर्मसत्ता आणि राजसत्तेच्याही विरोधात लढून आकाराला आलेल्या या देशात ईश्वरनिंदेच्या अधिकाराला एक अव्वल फ्रेंच प्रतीक मानले जाते. जवळपास ५० लाख मुस्लीम लोकसंख्या असलेल्या या देशात त्यातून संघर्षांचे प्रसंग येतात. कारण ईश्वर आणि त्याचा प्रेषित हे इस्लाममध्ये अमूर्त मानले जातात. इतर कोणत्याही युरोपीय देशापेक्षा – खरे तर पाश्चिमात्य देशापेक्षा फ्रान्स आणि जर्मनी हे स्थलांतरितांच्या बाबतीत आग्रहाने उदारमतवादी राहिले. फ्रान्सच्या फुटबॉल संघात विविध वंशीय, धर्मीय खेळाडू दिसतात आणि हा संघ जगज्जेताही होतो. झिनेदिन झिदानही मुस्लीम स्थलांतरितच. यांना आदर्श मानायचे, की भरदिवसा कोणाचा तरी शिरच्छेद करणाऱ्यांचे किंवा संगीतगृहे, मद्यालयांमध्ये निष्पापांवर गोळ्यांचा वर्षाव करणाऱ्यांचे 'धर्मरक्षक' म्हणून गुणगान करायचे, हा निर्णय फ्रान्समधील मुस्लिमांनी करायचा आहे. या साऱ्यांनी अधिक जोमाने फ्रेंच धर्मनिरपेक्षतेवरील असे हल्ले रोखण्याची वा धिक्कारण्याची गरज आहे. जगभर ज्या देशांनी भौतिक आणि वैचारिक प्रगती केली, त्या देशांमध्ये कोणत्याही धार्मिक नियम-परंपरेपेक्षा सर्वानुमते ठरवण्यात आलेल्या आणि वर्षांनुवर्षे सखोल चिकित्सा झालेल्या राष्ट्रीय कायद्यांना नेहमी प्राधान्य दिले गेले आहे हे लक्षात ठेवले तरी पुरेसे. 'मी तुझ्या मताशी सहमत नाही. पण तुला तुझे मत मांडू देण्याच्या अधिकाराचे रक्षण करायला मी नेहमीच पुढे येईन,' असे सांगणाऱ्या वॉल्टेअरचा हा देश. ते विचार आत्मसात करून स्वत:ची प्रगती करण्याची सुसंधी फ्रान्समधील हल्लेखोरांना होती. त्याऐवजी त्यांनी धर्मयुद्धाचा आत्मघातकी मार्ग पत्करला. यातून सर्वाधिक नुकसान कोणाचे होते आहे इतका तरी विचार इस्लामींनी करायला हवा.. ते त्यांच्यासाठीच गरजेचे आहे!

# चांदी आणि चांदीचे अनुकरण दागिने बेकायदेशीररित्या वाहतूक करताना कोटीचा मुद्देमाल जप्त



सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार वाशी टोल नाका येथे रात्री १:३० च्या दरम्यान एका महिंद्रा कंपनीच्या बंद बॉडीचा पिकप टेम्पो एम.एच.१२.क्यू.डब्ल्यू.५०३ घेऊन चालक आणि त्याच्या शेजारील एक व्यक्ती संशयास्पद स्थितीत पोलीसांना आढळून आले. टेम्पोमधील मालाची तपासणी करत असताना, त्यामध्ये एकूण ९२९ किलो ४१४ ग्रॅम चांदी आणि इमिटेशन ज्वेलरी असे एकूण ६,१७,७७,४१९ कोटीचा लूट माल आढळून आला.सदरची घटना दिनांक. २२/१०/२०२० रोजी मा.श्री.पोलीस उपायुक्त सुरेश मेंगडे, परिमंडळ-१ वाशी, नवी मुंबई यांच्या आदेशाने वाशी टोल नाका येथे रात्री सुमारे १:३० च्या दरम्यान वाशी पोलीस ठाण्याचे निरीक्षक श्री.रविंद्र दौंडकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.जी.डी.देवडी आणि परिमंडळ-१ पथक कडील स्टाफ असे नाकाबंदी करीत असताना घडली. पोलीसांनी गाडी थांबवून त्या गाडीत काय आहे अशी चौकशी केली तर त्यावर चालकाने त्यात चांदी व इमिटेशन ज्वेलरी असल्याचे सांगितले यावरून, त्या दोघांना वाशी पोलीस ठाणे येथे आणून वस्तू व सेवाकर विभाग सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई येथील अधिकाऱ्यांना बोलावून टेम्पो मधील मालाची पाहणी केली.हा चांदीचा लूट माल कुरियर सेवेच्या माध्यमातून पुणे, कोल्हापूर आणि इतर ठिकाणी जी.एस.टी न भरता वाहतूक करत असल्याचे निष्पन्न झाले. हा मुद्देमाल वस्तू व सेवा कर विभागाने इन्व्हेंटरी पंचनामा करून वाशी, परिमंडळ-१ पोलीस ठाण्याचा ताब्यात देण्यात आला आणि या गुन्ह्याची कायदेशीर कारवाईसाठी पोलीसांनी टेम्पो देखील ताब्यात घेतला. जप्त मुद्दे मालाची वस्तू व सेवाकर विभाग यांच्याद्वारे चौकशी करून पुढील योग्यती कारवाई चालू आहे.सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री बिपिनकुमार सिंग, मा.पोलीस सह.आयुक्त डॉ.श्री.जय जाधव, पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१ वाशी, श्री. सुरेश मेंगडे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त वाशी विभाग श्री विनायक वस्त,मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, तुर्भे विभाग,श्री. भरत गाडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाशी पोलीस ठाणे, संजय धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. रविंद्र दौंडकर व परिमंडळ एक पथक वाशीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.जी.डी.देवडे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

# विद्यार्थी-पालक समन्वय समितीने राज ठाकरेंची घेतली भेट



विद्यार्थी-पालक समन्वय समितीने आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची कृष्णकुंजवर भेट घेतली आहे. फी वाढीविरोधात आणि अकरावीच्या प्रवेशबाबत मुद्दे घेऊन विद्यार्थी-पालक समन्वय समितीने राज ठाकरेंची भेट घेतली. खासगी डॉक्टर, डब्बेवाले, जीम मालक, मूर्तिकार आणि कोळी महिलांनंतर आज राज ठाकरेंची विद्यार्थी-पालक समन्वय समितीने कृष्णकुंज निवासस्थानी राज ठाकरेंची भेट घेतली. यावेळी अकरावीची प्रवेश प्रक्रिया मार्गी लावा, अशी विद्यार्थी-पालकांनी मागणी केली आहे. जर प्रवेश प्रक्रिया लांबणीवर गेली तर कॉलेज कधी सुरू होणार? विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्षाचा प्रश्न असून काही विद्यार्थ्यांचे Admission झाले आहेत. तर त्याचे काय होणार अशा प्रकारे मुद्दे आज राज ठाकरेंसमोर विद्यार्थी-पालक समन्वय समितीने मांडले आहेत. तसेच यामध्ये काही पालकांचा फी वाढीचा देखील मुद्दा होता. काही शाळांनी राज्य सरकारच्या जीआरनंतरही फी वाढ केली आहे, असे त्यांचे म्हणणे होते. या भेटीमध्ये कोचिंग क्लासेसचे मालकही उपस्थित होते. कोंचिग क्लालेस सुरू करावेत, अशी त्यांची मागणी होती. यासंदर्भात राज ठाकरे यांनी शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांच्या फोनवरुन चर्चा केली. मागील काही महिन्यांपासून अनेकजण राज ठाकरे यांची कृष्णकुंज निवासस्थानी भेट घेत आहेत. मागच्या आठवड्यात वीज प्रश्नावरुन

राज ठाकरे यांनी राज्यपाल भगतसिंग कोश्याची यांची भेट घेतली होती. यावेळी त्यांनी वाढीव वीजबिलासंदर्भातील मुद्दा राज्यपालांसमोर मांडला. यावेळी राज ठाकरे यांच्यासोबत बाळा नांदगावकर, नितीन सरदेसाई, अमित ठाकरे, शालिनी ठाकरे, रिटा गुप्ता, शिरीष सावंत यांच्यासह मनसे शिष्टमंडळ राज्यपालांच्या भेटीला हजर होते. या सर्वांनी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची भेट घेऊन १० ते १५ मिनिटे चर्चा केली. राज्यपालांशी राज ठाकरे यांची ही पहिलीच भेट होती.

# मलजल प्रक्रिया केंद्रातून ऊर्जा निर्मिती; डिसेंबरमध्ये होणार निविदा प्रक्रिया पूर्ण



मुंबईतील सांडपाणी थेट खाडी आणि समुदात सोडले जात असल्याने राष्ट्रीय हरित लवादाने मुंबई महापालिकेला ४३ कोटींचा दंड आकारला आहे. मात्र दुसरीकडे मुंबईतील सांड पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी उभारण्यात येणार मलजल प्रक्रिया केंद्राचे काम १२ वर्षांपासून रखडले आहे. आता तिसऱ्यांदा मागवलेल्या निविदा प्रक्रिया पूर्ण करून डिसेंबर महिन्यात पूर्ण होऊन या कामांना सुरुवात होणार आहे. मात्र या मलजल प्रक्रिया केंद्रातून ५० टक्के पाण्याचा वापर पिण्याव्यतिरिक्त इतर वापरासाठी आणि ऊर्जा निर्मिती केली जाणार आहे.

मुंबईत सध्या एकमेव कुलाबा येथील दररोज ३७ दशलक्ष लीटर क्षमतेच्या मलजल प्रक्रिया केंद्र कार्यान्वित झाले आहे. उर्वरीत मालाड (४५४ दशलक्ष लिटर), भांडूप (२१५ दशलक्ष लिटर), घाटकोपर (३३७ दशलक्ष लिटर), धारावी (२५० दशलक्ष लिटर), वरळी (५०० दशलक्ष लिटर), वांद्रे (३६० दशलक्ष लिटर), वर्सोवा (१८० दशलक्ष लिटर) आदी ७ मल जल प्रक्रिया केंद्रांची कामे हाती घेण्यात येणार आहेत. या केंद्रांच्या उभारणीसाठी सल्लागारांची नेमणूक करण्यात आल्यानंतर त्यांच्या अहवालानुसार महापालिकेने यासाठी कंत्राटदारांची निवड करण्यासाठी निविदा मागवली होती.पुढील २५ वर्षांचे नियोजन करत हाती घेतलेल्या एमएस डीपी-२ प्रकल्प कामांसाठी १५ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित मानला जात होता. परंतु हा प्रकल्प लांबणीवर पडल्याने या प्रकल्पचा खर्च २० हजार कोटींवर पोहोचला जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# प्रतिबंधक व शरीरास प्राणघातक अशा मादक पदार्थाचा साठा करुन विक्री करणाऱ्या आरोपीला पनवेल शहर पोलीस ठाण्याने केले जेरबंद



वरिष्ठांन कडून मिळालेल्या माहितीनुसार दिनांक. २९/१०/२०२० रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजयकुमार लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उ.प.नि/ विश्वासराव बाबर, पो.उ.प.नि/ सुनील तारमळे व पोलीस अंमलदार यांनी गुप्त बातमीच्या सहाय्यने माहिती जमा करून, सेक्टर नं. ०४- करंजाडे. ता.पनवेल, जि. रायगड येथे जाऊन छापा टाकला. तर त्यांना तिथे एका इको कार क्र. ४६ए.पी. ५३२७ मध्ये शरीरास प्रतिबंधक असणारा पानमसाला आणि सुगंधित तंबाखूचा (गुटक्याचा)साठा मिळून आला.त्यामुळे मा. पोलीस आयुक्त श्री. बिपीनकुमार सिंह, पोलीस सह आयुक्त संजय जाधव, पोलीस उप.आयुक्त श्री.शिवराज पाटील व सहा.पोलीस आयुक्त श्री.रवींद्र गिड्डे यांनी मादक पदार्थ सेवनाचे भयंकर दुष्परिणाम लक्षात घेऊन अशा प्राणघातक पदार्थापासून समाजाला वाचवण्यासाठी सामाजिक उदात्त हेतूने सर्वांनी मादक पदार्थ विक्रीबाबत "झीरो टॉलरन्स" अशी संकल्पना राबवणे आवश्यक असल्याचे आदेश दिले आहे.सदरचा शरीरास प्रतिबंधक असणारा माल आरोपी नामे.विरेंद्र बुद्धसेन गुप्ता, वय ३४ वर्ष याचा असल्या-कारणाने पोलीसांनी त्यांचे राहते घर ताब्यात घेतले. आरोपीच्या घराची झडती घेत असताना, घरामध्ये देखील प्रतिबंधित मालाचा साठा आणि ग्राहकांना गुटखा खरेदी करण्यासाठी आमिष दाखवण्याकरता आण-लेल्या एलईडी सापडून आल्या.सदर आरोपीच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाणे गु.रजि. नं.३९४/२०२० भा.द.वि. कलम. १८८,२७२,२७३,३२८ सह अन्नसुरक्षा मानदे अधिनियम २००६ मधील कलम २६(२) (आय), २६(२) (आय व्ही) व कलम २७(३) (डी), २७(३)(ई) ५९ (३) प्रमाणे सरकार तर्फे फिर्यादि देऊन गुन्हा दाखल करण्यात आला.आरोपी विरेंद्र गुप्ता यांच्याकडून हस्तगत करण्यात आलेला माल-१) १,८३,६३६/- रुपये किंमतीचा सुगंधित तंबाखू पानमसाला गुडघ्याचे पॅकेट२)५०,२३०/- रुपये रोख रक्कम३) १,४७,०००/- रुपये किंमतीच्या सॅमसंग कंपनीच्या कंपनीच्या एकूण 40 एलईडी टीव्ही४) ४,००,०००/- रुपये किंमतीची इको कार क्र. एम एच ४६ ए.पी. ५६५७ जु.वा.कि.सु.एकूण ७,८०,८६६/- रुपये किंमतीचा माल जप्त करण्यात आला आहे. तसेच सदर गुन्ह्यातील आरोपीला अटक केली असून त्याच्याकडे कोणाचे अनुषंगाने पो.उ.प.नि./बाबर हे तपास करत आहे.सदर गुन्ह्याची कारवाई पनवेल शहर पोलीस ठाण्यातील उप.निरीक्षक / श्री.विश्वासराव बाबर, पोलीस उप निरीक्षक/ सुनील तारमळे ,पो.हवा/ १२३० फाळके, पो.ना/२४४१ किरण सोनवणे, पो.ना/३२२४ नवनाथ शिरकुळे,पो.शि/३५८३ सुनील गर्दनमारे, पो.शि/३२३९ विवेक पारासुर, म.पो.ना /१८९१ ललीता पाटील, म.पो.ना/२८५७ धायगुडे यांनी केली आहे.

# बनावटीचे सोने ज्वेलर्स व्यापाराला विकून 38 लाख रुपयांची फसवणूक करणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेकडून करण्यात आले जेरबंद

सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार हैदराबाद येथील ज्वेलर्स व्यापारी श्री.पवन कुमार नलामोधु साईबाबा नायडू यांना एका फसवणूक करणाऱ्या माणसाने मोबाईल फोन द्वारे संपर्क साधून त्यांना कमीत कमी १ किलो सोने देतो असे सांगून त्यांना मुंबईत बोलवले. यात ४ जण सामील असून पवनकुमार यांचा विश्वास जिंकून त्यांच्याकडे वेळोवेळी ३९ लाख रुपये रोखीने घेऊन त्यांना बनावटीचे सोने देऊन त्यांची फसवणूक केली. या संपूर्ण गुन्ह्याची तक्रार श्री.पवन कुमार नायडू यांनी दिनांक. १/१०/२०२० रोजी मुंबई येथील अंधेरी एमआयडीसी पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर क्रमांक. ३०/२०२० भांदविसक, ४०२,४०६,३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला. गुन्हा दाखल झाल्याचे समजल्यावर आरोपी मुंबईतून पसार झाले. दिनांक. ३०/१०/२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे स.पो.नि.भीमसेन गायकवाड यांना विक्रमगड तालुक्यातील तलपाडा धोतीपाडा येथील काही बातमीदाऱ्यांनी गेल्या दोन दिवसापासून एक व्यक्ती संशयित रित्या गावच्या जंगल परिसरात फिरत असल्याचे फोनद्वारे सांगितले..सदर ठिकाणी तात्काळ सहा. फौज. सुनील नलावडे व पो. हवा. संतोष काळे यांना पाठवून संशयित व्यक्तीला ताब्यात घेतली आणि बोईसर युनिट कार्यालय येथे आणून त्याची विचारपूस केली. तेव्हा, त्यांने त्याचे नाव.मोहम्मद



वसीम माबद अब्दुल खान वय ३२ वर्ष सध्या रा. पिलोना नगर, पालघर असे सांगितले.पोलीस अधिकाऱ्यांनी त्याला जंगल परिसरात फिरायचे कारण विचारले, तर त्याने मुंबई,अंधेरी एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे येथे फसवणुकीचा गुन्हा दाखल असल्यामुळे तो आणि त्याच्या तीन मित्रांसोबत मुंबईतून पसार झाल्याचे सांगितले.या गुन्ह्याबाबत अंधेरी एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात संपर्क साधून माहिती घेऊन सदर आरोपीच्या विरुद्ध मुंबई, अंधेरी एम.आय.डी.सी.पोलीस ठाणे गुन्हा दाखल असून त्याने त्याच्या ३ मित्रांसह हैदराबाद येथील ज्वेलर्स व्यापारीची ३९ लाख रुपयांची फसवणूक केल्याचे निष्कर्षणात आले. या आरोपींवर कायदेशीर कारवाई करून अंधेरी, मुंबई पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले.सदर गुन्ह्याची कारवाई मा.श्री. दत्तात्रय शिंदे ,पोलीस अधीक्षक पालघर मा.श्री. प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक पालघर, मा. श्री. रविंद्र नाईक, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा पालघर यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि.भीमसेन गायकवाड ,सहा. फौज. सुनील नलावडे, पो. हवा.संतोष निकाळे, संदीप सरदार, दिपक राऊत, संदीप सूर्यवंशी, पोलीस नाईक नरेंद्र पाटील, कपिल नेमाडे यांच्या पथकाने केली आहे.

# अकरावी प्रवेशाबाबत येत्या दोन दिवसांत निर्णय होईल – शिक्षण मंत्री



अकरावी प्रवेशाबाबत येत्या दोन दिवसांत निर्णय घेतला जाईल, अशी माहिती शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांनी दिली आहे. त्यामुळे गेल्या दोन महिन्यांपासून ऑनलाईन ॲडमिशन होऊनही अर्धी रखडलेली प्रवेश प्रक्रिया आता पूर्ण होण्याची शक्यता आहे.वर्षा गायकवाड म्हणाल्या, "ऑनलाइन अभ्यासक्रमाबाबत सातत्याने प्रश्न विचारला जातोय की अभ्यासक्रम कधीपासून सुरु होणार आहे. कारण अकरावीचे काही प्रवेश बाकी आहेत. परंतू आपल्याला हे माहिती आहे की मधल्या काळामध्ये सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणाला स्थगिती दिली होती. त्यानंतर शालेय शिक्षण विभागाच्या माध्यमातून अकरावीची प्रवेश प्रक्रिया थांबवण्यात आली होती. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आजच महाअधिवक्त्यांशी चर्चा करणार आहे. त्यानंतर येत्या दोन दिवसांत याबाबत निर्णय घेतला जाईल." दरम्यान, ऑनलाइन-ऑफलाइन प्रवेश झाले आहेत. तसेच ऑनलाइन अभ्यासाचा लाभ प्रवेश न झालेल्या विद्यार्थांनाही घेता येणार असल्याचे यावेळी गायकवाड यांनी सांगितले.

# असं बोलून संजय राऊतांनी मुख्यमंत्र्यांनाच आरसा दाखवला



महाराष्ट्राच्या राजकारणाचा केंद्रबिंदू राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्यामुळे पुण्याला असल्याचे सांगत शिवसेना नेते संजय राऊत यांनीच मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना आरसा दाखवला, असा टोला भाजपा मीडिया सेलचे नेते अवधूत वाघ यांनी लगावला आहे.

भाजपाच्या अवधुत वाघ यांनी ट्विट करत संजय राऊत यांच्या पुण्यातील संभाषणाचा समाचार घेतला. "शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे होते, तेव्हा मुंबई हे महाराष्ट्राच्या राजकारणाचा केंद्रबिंदू होता. आता शरद पवार यांच्यामुळे तो पुणे झाला आहे, असं बोलून संजय राऊतांनी मुख्यमंत्र्यांना आरसा दाखवला" असे ट्वीट अवधूत वाघ यांनी केले आहे. बाळासाहेब होते तेव्हा मुंबई हे महाराष्ट्राच्या राजकारणाचा केंद्रबिंदू होता. आता (पवार साहेबांमुळे) तो पुणे झाला आहे...असं बोलुन संजय राऊतांनी मा. मुख्यमंत्र्यांना आरसा दाखवला.

खासदार संजय राऊत काय म्हणले होते?

ठाकरे सरकार कोसळेल अशा पैजा लागल्या होत्या, पण ठाकरे सरकार पाच वर्ष टिकेल असा विश्वास शिवसेना खासदार आणि प्रवक्ते संजय राऊत यांनी व्यक्त केला आहे. महाराष्ट्राच्या राजकारणाचं केंद्रबिंदू पुणे राहिलं आहे. बाळासाहेब ठाकरे होते तोपर्यंत तो मुंबईत होता असंही यावेळी त्यांनी सांगितलं. पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

"महाराष्ट्राच्या राजकारणाचा केंद्रबिदू पुणे राहिलं आहे. बाळासाहेब ठाकरे होते तोपर्यंत तो मुंबईत होता. अनेक काळ देशाचं आणि राज्याचं राजकारण बाळासाहेबांमुळे मुंबईतून घडत होतं, बदलत होतं. आता सगळे प्रमुख लोक पुण्यात आहेत," असं संजय राऊत यांनी म्हटलं. पुढे बोलताना संजय राऊत यांनी महाविकास आघाडी सरकारला होणाऱ्या वर्षपूर्तीनिमित्त भाष्य केलं.

# सीसीटीव्ही फुटेज देऊनही लागेना चोरांचा छडा; वाढत्या चोऱ्यांनी उद्योजक त्रस्त

पिंपरी : औद्योगिक परिसरातील चोऱ्यांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. चोरीचे सीसीटीव्ही चित्रण देऊनही चोरट्यांचा छडा लावण्यात आणि चोरीचा माल हस्तगत करण्यात अपयश येत आहे. परिरासरात वारंवार चोऱ्या करणाऱ्या अट्टल गुन्हेगारांचा बंदोबस्त करावा, गस्ती पथक नेमावे अशी मागणी पिंपरी चिंचवड लघु उद्योजक संघटनेच्या वतीने पोलीस आयुक्तांकडे करण्यात आली आहे.चिंचवड येथील ऑटो क्लस्टर येथे पोलीस आयुक्तालय , महानगरपालिका आणि विविध सामाजिक संघटनांच्या वतीने विधिसंघर्ष बालकांचे पुनर्वसन या विषयावर एक दिवसीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या वेळी पिंपरी चिंचवड लघु उद्योजक संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे यांनी पोलीस आयुक्त कृष्ण प्रकाश यांना औद्योगिक परिसरातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्याबाबत निवेदन दिले.बाल गुन्हेगारांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले जातील. त्यांना शिक्षण देण्यासाठी तसेच रोजगार मिळवून देण्यासाठी संघटनेच्या वतीने प्रयत्न करण्याचे आश्वासन संघटनेच्या वतीने देण्यात आले.



पिंपरी चिंचवड औद्योगिक परिसरातील तळवडे, सोनावणे वस्ती, कुदळवाडी, चिखली, शांतीनगर, प्राधिकरण भाग ७ ते दहा, एमआयडीसी भोसरी, पिंपरी आणि चिंचवड या औद्योगिक परिसरात चोरीच्या प्रमाणात वाढ झाली आहे. चोरटे टोळक्याने येऊन सुरक्षा राक्षकला शास्त्राचा धाक दाखवून चोरी करतात. अशा वेळी सुरक्षा रक्षक प्रतिकार करू शकत नाही. पोलिसांच्या सांगण्यावरून उद्योजकांनी परिसरात सीसीटीव्ही बसविले आहेत. मात्र चोरीचे छायाचित्रण देऊनही चोर अथवा चोरीच्या मालाचा तपास लागला नसल्याचे संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.पोलीस दप्तरी औद्योगिक परिसरात चोऱ्या करणाऱ्या अट्टल गुन्हेगारांची नोंद आहे. त्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त झाला पाहिजे. महिला कामगारांच्या छेडछाडीच्या प्रकार वाढले आहेत. सोनसाखळी हिसकवण्याचे प्रकारही घडतात. त्यामुळे अतिरिक वेळ काम करण्यास महिलावर्ग राजी होत नाही. पुरुष कामगारांना अडवून लुटले जाते.

# हॉलिडे पॅकेजवर डिस्काऊंटच्या आमिषाने 18 जणांची फसवणूक; कंपनीच्या संचालकाविरुद्ध गुन्हा दाखल




पुणे : तीन वर्षांच्या हॉलिडे पॅकेजवर डिकाऊंट देण्याचे अमिष दाखवून सभासदांकडून पैसे घेऊन १८ जणांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. गोलीजर इंटरनॅशनल या कंपनीचे संचालकांनी कार्यालय बंद करुन पळ काढला आहे. याप्रकरणी चतु:श्रृंगी पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. प्रसाद मोरे, आशिष जगताप आणि विशाल भोर अशी त्यांची नावे आहेत. याप्रकरणी संजय राचेल्ली (वय ४३, रा़ जुनी सांगवी) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोलीजर इंटरनॅशनल या कंपनीचे सेनापती बापट रोडवरील आयसीसी ट्रेड टॉवरमध्ये कार्यालय आहे. कंपनीचे संचालक व इतरांनी फिर्यादींना तीन वर्षाचे हॉलिडे पॅकेजवर २० हजार रुपये डिस्काऊंट देण्याचे अमिष दाखविले. त्यांना पैसे भरुन सभासद होण्यास भाग पाडले. फिर्यादी यांच्याकडून ७६ हजार ५०० रुपये घेतले. त्यानंतर त्यांना कोणतीही सेवा न देता कोणालाही न कळविता अचानक कार्यालय बंद केले. तसेच पैसे परत करण्यास नकार देऊन फिर्यादीची फसवणूक केली. राचेल्ली यांच्याप्रमाणेच आणखी १७ सभासदांनी आपली फसवणूक केल्याची तक्रार केली असून फसवणूक झालेल्यांची संख्या अजून वाढण्याची शक्यता आहे. चतु:श्रृंगी पोलीस अधिक तपास करीत आहेत.


# IPL क्रिकेटवर सट्टा चालवणाऱ्या दोघांना लॉजमधून अटक

मीरारोड - भाईंदर पूर्वेच्या जया महल लॉज मधील खोली भाड्याने घेऊन त्या मधून क्रिकेटवर सट्टा चालवणाऱ्या दोघा आरोपींना नवघर पोलिसांनी १ लाखांच्या मुद्देमालासह अटक केली आहे . वरिष्ठ पोलीस निरीक्षक संपत पाटील , सहाय्यक निरीक्षक योगेश काळे व व रोशन देवरे आणि पोलीस पथकाने शुक्रवारी रात्री सव्वा नऊच्या सुमारास जया महल लॉजच्या



एका खोलीत छापा मारला. त्यावेळी तेथे आयपीएल क्रिकेट सामन्यावर सट्टा चालवला जात असल्याचे उघडकीस आले . शैलेंद्रसिंग भारतसिंग मालावत (४२) रा . स्प्रिंगरोज , जहांगीड एन्क्लेव्ह , मीरारोड व सुमित प्रकाश जैन (३८) रा. श्री गंधर्वराज , बाळाराम पाटील मार्ग , भाईंदर या दोघा सट्टेबाजांना अटक केली . त्यांच्या कडून मोबाईल , लॅपटॉप , एलईडी व रोख मिळून १ लाख ३ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला . सदर लॉजची खोली घेण्यासाठी आरोपींनी शेख मोहमद याच्या नावाच्या व्यक्तीच्या आधारकार्ड चा वापर केला होता . मॅचच्या ओव्हर नुसार देखील सट्टा घेत असत

# लग्न समारंभासाठी मर्यादा वाढवणार? राजेश टोपे यांनी दिले संकेत



मुंबई: राज्यात करोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर लग्न समारंभासाठी अटी व शर्तीसह ५० लोकांना परवानगी देण्यात आली होती. आता मात्र लवकरच या संख्येत वाढ करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी याबाबत माहिती दिली आहे. लॉकडाऊननंतर राज्यात मिशन बिगीन अंतर्गत अनेक निर्बंध हटवण्यात आले आहेत. लग्न समारंभाचे आयोजन मंगल कार्यालयात करण्याची परवानगी राज्य शासनाकडून यापूर्वीच देण्यात आली होती. ५० जणांच्या उपस्थितीत सुरक्षित अंतर पाळून मंगलकार्यालयात लग्न सोहळ्याचे आयोजन याआधी करता येत होते. मात्र आता या संख्येत अधिक वाढ करण्याचा विचार सरकार करत आहेत. दिवाळीनंतर यावर सरकार निर्णय घेणार असल्याचं, राजेश टोपे यांनी म्हटलं आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत).संपर्कः-9594418181 / 8424989898